# इंडियन हेरिटेज व्हॅली

## कल्पनेतली -चित्र`नगरी

---------------------------------------------------------------

चित्रपट, मालिका, वेबमालिका असा मनोरंजनाचा पसारा विस्तारत चालला आहे. कोट्यवधींची उलाढाल असलेल्या या मनोरंजन क्षेत्रासाठी चित्रीकरणाच्या जागा हा आजही निकडीचा प्रश्न आहे. मुंबईपासून दूर असलेली चित्रनगरी वा ठाणे, मीरारोड, नायगाव सारख्या दूर उपनगरात गर्दीने उभे राहिलेले छोटेखानी बंगलेवजा स्टुडिओ, कॉर्पोरेट स्टुडिओही सध्या कमी पडत आहेत. या सगळ्या गर्दीत मुंबई आणि नाशिकपासून बरोबर ९० किमी अंतरावर -इंडियन हेरिटेज व्हॅली॰ नावाची एक आकर्षक आणि निसर्गाच्या कुशीत लपलेली चित्रनगरी वसली आहे.

### इंडियन हेरिटेज व्हॅली

सध्या अनेक मराठी मालिकांचे चित्रीकरण मुंबईबाहेर सांगली, सातारा, नाशिक परिसरात सुरू आहे. या चित्रीकरणासाठी कलाकार, तंत्रज्ञ आणि एकूणच युनिटला घरापासून महिनोन् महिने दूर राहून काम करावं लागतं. मुंबईपासून अंतराचा विचार करता ठाणे जिल्ह्यातच असलेल्या शहापूर तालुक्यात अगदी मोक्याच्या जागी इंडियन हेरिटेज व्हॅली वसवण्यात आली आहे. आसनगाव रेल्वे स्थानकापासून १० किमी अंतरावर शहापूर तालुक्यातील शिलोत्तर गावात ३५ एकरच्या विस्तीर्ण जागेत हिरव्यागार वनराईच्या कुशीत ही आधुनिक आणि काहीसा शांत-निवांत अनुभव देणारी चित्रनगरी उभी राहिली आहे.

### महामार्गांच्या साक्षीने...

कुठल्याही चित्रीकरणासाठी दळणवळणाची साधने हा महत्वाचा विषय ठरतो. मुंबई आणि नाशिक दोन्हीकडून बरोबर ९० किमी अंतरावर मधोमध उपलब्ध असलेली इंडियन हेरिटेज व्हॅलीची जागा आजूबाजूला असलेल्या महामार्गांच्या जाळ्यामुळे अधिक लाखमोलाची ठरते आहे. या जागेपासून नाशिक मुंबई महामार्ग ९ किमी अंतरावर आहे. नव्याने आणि वेगाने विकसित होऊ लागलेला नागपूर समृध्दी महामार्ग या जागेपासून ५ किमी अंतरावर आहे. इथून माळशेज घाट ५० किमी तर माहूली किल्ला

फक्त १५ किमीवर आहे. याशिवाय, प्रसिध्द जैन तीर्थस्थान असलेले मानस मंदिर येथून १५ किमी अंतरावर आहे, तर भातसा धरण ८ किमी अंतरावर आहे.

## नदी, डोंगर, किल्ला आणि बरंच काही...

ऐतिहासिक - पौराणिक मालिका, चित्रपट यांची वाढती संख्या पाहता त्यादृष्टीने अनेक जागा -इंडियन हेरिटेज व्हॅली॰ परिसरात डिझाईन करण्यात आल्या आहेत. मुळातच ५० एकर सरकारी जंगल परिसराने वेढलेल्या अशा जागेत बारमाही वाहणारी नदी आहे. त्यामुळे नदीकिनारा आणि जंगल या दोन्हींच्या मदतीने छोटेखानी गावाचा सेट चित्रीकरणासाठी उभारणे सहज शक्य आहे.

## चित्रीकरणासाठी उपलब्ध मोकळ्या जागा

१. १००० * ४०० स्क्वेअर फुट मोकळी जागा.
२. ६०० * ९०० स्क्वेअर फुट मोकळी जागा.
३. ३० * ३० स्क्वेअर फुटाचं दगडी स्टेज.
४. ५ फुट उंचीचं २० *६० स्क्वेअर फुट स्टेज आणि या स्टेजसमोर असलेली १८० * १३० स्क्वेअर फुटाची मोकळी जागा.

## खास चित्रिकरणासाठी...

१. कुंड - ५१* ५१ फुट (वरती मंगलौरी कौलं असलेलं हे आरामदायी कुंड मैफिलीसाठी शानदार जागा म्हणूनही वापरता येतं)
२. ३० फुट उंच आणि १२०० फुट लांबलचक काळ्या दगडाने बांधलेली किल्ल्याची तटबंदी. (त्यालाच लागून एक गुप्त दरवस्तू
३. २०*२० ची भूमिगत जागा
४. २५ फुट उंचीची भव्य दीपमाळ
५. ४० फुट खोल वॉटर डॅम (डॅमच्या दोन्ही बाजूला आरसीसी वॉल)
६. एक हजार स्क्वेअर फुटांचा दगडी रस्ता
७. ९० फुटांचा धबधबा
८. एक बोट
९. दोन हजार वेगवेगळी झाडे

१०.वॉच टॉवर

११.हेलिपॅड

१२.अँटीक वस्तू

**सोयीसुविधा**

११ एसी सूट्स

२ नॉन एसी रुम्स

५ अँटीक टेबल्स आणि २६ अँटीक खुर्च्या

१०० प्लॅस्टिक चेअर्स आणइ १५ टेबल्स.

३६० किलोवॅटचा इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मर

६४ किलोवॅटचा डिझेल जनरेटर

१० कामगार

३ सुरक्षा चौकी

६ मोठमोठाले गेट्स

पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल

शहरापासून दूर आणि निसर्गाच्या कुशीत असलेली इंडियन हेरिटेज व्हॅली गावापासून एका टोकाला जंगलाच्या जवळ आहे. त्यामुळे इथे बाहेरून कोणी चित्रीकरणात अडथळे आणण्याची शक्यता उरत नाही. आवश्यक ते सामान आणण्यासाठी ४ किमीवर बाजार उपलब्ध आहे. शिवाय, अगदी कमीत कमी किंमतीत स्थानिक कुशल कामगार उपलब्ध होऊ शकतात.

अधिक माहितीसाठी - श्री. राहुल शिरसाट, संपर्क : ९८६९४९४७६६.

———————————————————————————